# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

## (सकाळ)

जा.क्र.८०१/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०५/१२/२०१७

**१) अज्ञात चारचाकी वाहनाच्या धडकेत एकाचा मृत्यु :—**

दिनांक ०२/१२/२०१७ चे २०.१५ वाजता दरम्यान यातील मृतक नामे रोशन सदाशिव भलावी वय २३ वर्ष रा. किरणापुर हा त्याचे मित्रासह आठवडी बाजार करीता मौजा कांद्री जिल्हा भंडारा येथे गेला असता परत येत असता, समोरून येणारे अज्ञात चारचाकी वाहनाने मृतकचे स्कुटी गाडीला ठोस मारल्याने तिघेही खाली पडुन गंभिर जखमी झाल्याने यात मृतक रोशन भलावी हा मरण पावल्याने फिर्यादी नारायण बुधा वरकडे वय ४८ वर्ष रा. पांजरा यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन अरोली (नागपुर ग्रामीण) येथे अप क्र.००/१७ कलम २७९,३३७, ३०४ (अ) भादवीचा दाखल असुन सदर गुन्हयाचे कागदपत्र पो.स्टे. अरोली जिल्हा नागपुर ग्रामीण येथुन प्राप्त झाल्याने पोलीस स्टेशन आंधळगाव येथे अन्वये नंबरी गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. म्हसकर पोलीस स्टेशन आधंळगाव हे करीत

**२) विवाहितेला शारीरीक व माणसीक त्रास देवुन मारपीट केल्याने गुन्हा नोंदः—**

दिनांक ०४/१२/२०१७ चे पुर्वी पासुन यातील फिर्यादी व आरोपी क्र.१ हे पती पत्नी असुन त्याच प्रमाणे आरोपी क्र. २ ते ५ सासु ननंद व नंदई हे नातेवाईक आहेत फिर्यादीला आरोपीतांनी लग्नामध्ये फिर्यादीच्या आई वडीलांना १०,००००० /रु. व कार का दिली नाही म्हणुन, आरोपीतांनी संगनमत करून शारीरीक व मानसीक त्रास देवुन मारपीट केल्याने, फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा कलम ४९८ (अ), ३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. उईके पोलीस स्टेशन भंडारा हे करीत

**३) मोटार सायकलच्या धडकेत सायकल स्वार गंभिर जखमी :—**

दिनांक ०३/१२/२०१७ चे १९.३० वाजता दरम्यान यातील जखमी सुभाष रामकृष्ण बावणकुडे वय ४० वर्ष रा. मुरमाडी हा त्याचे सायकलने एनएच ०६ रोड ओलांडीत असता साकोली कडुन भंडारा कडे जाणाऱ्या यातील आरोपी चालकाने,त्याचे ताब्यातील मोटार सायकल हयगयीने व निष्काळजीपणे चालवुन जखमीच्या सायकलला धडक मारून गंभिर जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने, फिर्यादी सुभाष रामकृष्ण बावणकुडे वय ४० वर्ष रा. मुरमाडी यांचे बयान व डॉ. रिपोर्ट वरू पोलीस स्टेशन लाखनी कलम २७९,३३८ भादवी. सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा काटेखाये पोलीस स्टेशन लाखनी हे करीत

**४) क्षुल्लक कारणा वरून काठीने मारून जखमी केल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक ०४/१२/२०१७ चे १२.०० वाजता दरम्यान यातील आरोपीने त्याची पत्नी व मुलाबाळांना दारू—पाणी पिवुन मारपीट करून घराचे बाहेर काढल्याने, आरोपीची पत्नी ही आपले मुलाबाळांना घेवुन फिर्यादीचा चुलत सासरा याचे घरी गेल्याने, फिर्यादी हा आरोपीला हटकण्यास गेला असता, माझ्या घरी का आलास म्हणुन भांडण करून फिर्यादीस काठीने डोक्यावर, छातीवर मारपीट करून जखमी केल्याने व मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी उरकुडा मोतीराम मेश्राम वय ६० वर्ष रा. अजीमाबाद यांचे बयान व डॉ. रिपोर्ट वरू पोलीस स्टेशन कारधा कलम ३२४,५०६ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा बहादुरे पोलीस स्टेशन लाखनी हे करीत

५) अल्पवयीन मुलीला पळवुन नेल्याने गुन्हा नोंद :–

दिनांक ०४/१२/२०१७ चे ५.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी हा त्याचे कुटुंबासह जेवन करून घरी झोपला असतांना फिर्यादी हा सकाळी झोपुन उटला असतांना फिर्यादीची अल्पवयीन मुलगी ही खाटेवर दिसली नाही तिचा शोध घेवुन मिळुन न आल्याने फिर्यादीने मुलगी गुम झाल्याची तोंडी तक्रार दिल्याने व मा. सर्वोच न्यायालयाचे निर्देशाअन्वये व पिडीत अल्पवयीन मुलगी हीला कोणीतरी अज्ञात आरोपीने पळवुन नेल्याने फिर्यादी यांचे रिपोर्ट वरू पोलीस स्टेशन लाखनी कलम ३६३ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा सार्वे पोलीस स्टेशन लाखनी हे करीत

६) जंगल शिवारात कुजलेल्या स्थितीत इसमाचे प्रेत मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :–

दिनांक ०६/११/२०१७ चे १०.०० वाजता ते आज पर्यंत यातील मृतक बळीराम पाडु दिघोरे वय ७५ रा. खैरलांजी हा बोथरा येथे मंडई पाहुन ६/११/२०१७ चे १०.०० वा. दरम्यान जगलातुन खैरलांजी येथे येत असता रस्ता समजला नाही, व कचरा जास्त असल्याने जंगल शिवारात मृत स्थितीत कुचलेल्या अवस्थेत मिळुन आल्याने, फिर्यादी बबन बळीराम दिघोरे वय ४७ वर्ष रा. खैरलांजी यांचे रिपोर्ट वरुन पोस्टे साकोली येथे कलम १७४ जा.फौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बागडे पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

७) आमरोड वर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :–

दिनांक ०४/१२/२०१७ चे १३.३० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील ऑटो आमरोडवर येणा–या जाणा–या वाहुतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अशा स्थितीत ऊभी करून मिळुन आल्याने सर तर्फे फिर्यादी पोहवा. रामटेके यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पालांदुर येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. भलावी पो.स्टे. पालांदुर हे करीत आहेत.

८) आमरोड वर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :–

दिनांक ०४/१२/२०१७ चे १५.३० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील ऑटो आमरोडवर येणा–या जाणा–या वाहुतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अशा स्थितीत ऊभी करून मिळुन आल्याने सर तर्फे फिर्यादी पोहवा. राऊत यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पालांदुर येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. भलावी पो.स्टे. पालांदुर हे करीत आहेत.

९) अवैध दारू अड्डयांवर धाडी . :–

दिनांक ०४/१२/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन लाखांदुर व वरठी येथील अवैध दारू अड्डयांवर धाडी घालुन एकुण ०२ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ०८ हातभट्टी दारू किंमती ४८०/–रु. व १ लिटर ८० मिलीलीटर देशी दारू किमती ३६०/रु असा एकुन ८४०/रु चा माल जप्त करण्यात आला.

१०) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–

दिनांक ०४/१२/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ९३ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवाशी ०१ तीन सिटर वाहनांवरती १५ केसेस व ईतर वाहनांवरती ९३ केसेस करण्यात आलेले आहे.

PSV
(मपोउपनी. प्रणती लांजेवार)
माहिती कक्ष भंडारा
दुरध्वनी.क्र. ८८०५६५७६२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.